**विषय :- श्री साईबाबा संस्थानमार्फत तसेच साईभक्तांच्या सहभागातून देशभरात श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणे व मंदिरे उभारणीसाठी अनुदान देणेबाबत...**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद :-**

१) अधिनियमाचे कलम १७ (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७(२) (ठ) मध्ये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील, तसेच (ड) मध्ये श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल, अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

३) अधिनियमाचे कलम २१ (१)(ख) अन्वये, रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) कलम २१(१)(ग) अन्वये, “भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे”.

५) कलम २१(१)(ड) अन्वये, “श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे”.

**प्रस्तावना :-**

श्री साईबाबा मंदिर आज जगभरातील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असल्याने त्यास विश्वमंदिराचे स्वरुप प्राप्त झालेले आहे. श्री साईबाबांनी दिलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या संदेशास वर्तमानकाळात विशेष महत्व प्राप्त झाले आहे. असे थोर संत श्री साईबाबा हे शिर्डी येथे मंगळवार दि.१५ ऑक्टोबर, १९१८ या दिवशी पंचतत्वात विलीन झाले. तद्नंतर साईभक्तांनी बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यास आरंभ केला.

श्री साईबाबा संस्थानमार्फत दि.०१.१०.२०१७ ते दि.१८.१०.२०१८ अखेर श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठया प्रमाणावर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांबरोबरच देशाच्या विविध शहरांमध्ये पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शताब्दी सोहळयामध्ये कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे

अधिकारी/ पदाधिकारी यांच्या सूचना वजा प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी शिर्डी येथे दि.११.१२.२०१६ रोजी व दि.२३.१२.२०१७ रोजी जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

आता, संस्थान अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने संपूर्ण देशभरात श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणेबाबत चर्चा झाली आहे. श्री साईबाबांचे देश-विदेशात कोट्यावधींच्या संख्येने भक्तगण असून असंख्य साई मंदिरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन व प्रशासन तेथील भक्तगणांमार्फत पाहिले जाते.

**अ) <u>श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणीबाबत</u> :-**

श्री साईबाबा संस्थानमार्फत देशभरात नवीन श्री साईबाबांची मंदिरे उभारावयाची झाल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबांची मंदिरे उभारणीसाठी देशातील विविध राज्ये, शहरे, गांव यांची निश्चिती करणे. सदर मंदिरामध्ये धार्मिक रुढी-परंपरेनुसार पूजा-अर्चा, उत्सव, समारंभ साजरे करण्यास प्रोत्साहन देणे व त्याद्वारे श्री साईबाबांची महती व प्रचार-प्रसार होण्यास मदत होईल.

२) श्री साईबाबांची मंदिरे उभारणीसाठी साईभक्तांकडून देणगी स्वरुपात जमीन किंवा राज्य शासनाकडून मोफत जमीन मिळाल्यास मंदिर उभारणी करता येईल, यासाठी सर्व खर्च संस्थानमार्फत करता येईल.

३) श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणीसाठी Construction of Sai Temples नांवाने निधी उभारुन, विहीत नियमावलीद्वारे त्यासाठी देणगी देण्यासाठी भक्तांना आवाहन करता येईल.

४) श्री साईबाबा संस्थानमार्फत मंदिर उभारणीसाठी शहराची लोकसंख्या, जागेचे निकष, विहीत मंजु-या, जागेचे आकारमान, मंदिर बांधकामाचा आराखडा, नोंदणी इ. बाबत कार्यवाही करता येईल.

५) लोकसंख्येचा विचार करुन देशाच्या ज्या भागामध्ये श्री साईबाबांची मंदिरे नाहीत, अशा ठिकाणी मंदिर उभारणीसाठी प्राधान्य देणे. ज्या भक्तांना शिर्डी येथे दर्शनासाठी येण्यास अडचणी येतात, त्यांना त्याच ठिकाणी दर्शन करणे सोईचे होईल.

६) साई मंदिरे उभारणीसाठी शहराची निश्चिती झाल्यानंतर कार्यगटाची स्थापना करुन त्या ठिकाणच्या जागेचे सर्वेक्षण करुन अहवाल सादर करणे.

७) साई मंदिरे उभारणीसाठी अंदाजपत्रकीय तरतुद करणे.

८) साई मंदिरे उभारणी बरोबरच मंदिर परिसरात अन्नछत्र चालविणे, मंगल कार्यालय, रुग्णालय, शाळा इत्यादी बांधणे, तसेच सामाजिक उपक्रम राबविणे.

९) श्री साईबाबांचे मंदिर व्यवस्थापन मुख्य कार्यालय शिर्डी यांचेमार्फत नियंत्रित केले जाईल.

१०) श्री साईबाबांचे मंदिर निर्माण करण्यासाठी संस्थानमार्फत तांत्रिक समिती गठीत करण्यात येईल.

११) सदर मंदिर व्यवस्थापनाच्या माध्यमातून तेथील देणगी, दैनंदिन पूजा-अर्चा इ. चे कामकाज पाहणे. मंदिरास प्राप्त होणा-या देणग्या व वस्तुंबाबत नियमावली तयार केली जाईल.

१२) सदर मंदिर व्यवस्थापनासाठी नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची नियमावली व अधिकार निश्चित करणे. सद्यस्थितीत, सामान्य प्रशासन विभागामार्फत कामकाज केले जाईल.

१३) श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथे स्वतंत्र विभागाची निर्मिती करुन साईभक्तांकडून प्राप्त झालेली देणगी रक्कम, सोने-चांदी, मौल्यवान जड-जवाहीर, परकीय चलन,इतर वस्तू इ. यावर संपूर्ण नियंत्रण ठेवण्यात येईल.

१४) सदर विभागाचे इतर विभागांप्रमाणे जमा-खर्चाचे वेळोवेळी तसेच दरवर्षी लेखापरिक्षण केले जाऊन अहवाल श्री साईबाबा संस्थानला सादर करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

**ब) श्री साईभक्तांच्या सहभागातून देशभरात श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारणे व मंदिरे उभारणीसाठी अनुदान देणेबाबत :-**

श्री साईभक्तांच्या सहभागातून देशभरात श्री साईबाबांची नवीन मंदिरे उभारावयाची झाल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) श्री साईबाबांची मंदिरे उभारणीसाठी देशातील विविध राज्ये, शहरे, गांव येथे साई मंदिर उभारणीस साईभक्तांची मागणी असेल, सदर मंदिरामध्ये धार्मिक रुढी-परंपरेनुसार पूजा-अर्चा, उत्सव, समारंभ साजरे करण्यास प्रोत्साहन देणे व त्याद्वारे श्री साईबाबांची महती व प्रचार-प्रसार होण्यास मदत होईल.

२) अनुदान मागणी झाल्यानंतर अधिकृत ट्रस्ट असणे आवश्यक राहील. तसेच ज्या ट्रस्टचे लेखापरिक्षण होत असेल, अशा प्रस्तावांचा विचार केला जाईल.

३) साई मंदिरे उभारणीसाठी अनुदान देणेकामी नियमावली तयार करुन विहीत नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येतील.

४) शहराची लोकसंख्या, जागेचे निकष, विहीत मंजु-या, जागेचे आकारमान, मंदिर बांधकामाचा आराखडा, नोंदणी इ. बाबींचा उल्लेख करण्यात येईल.

५) साई मंदिर उभारणीसाठी प्राप्त प्रस्तावांबाबत तांत्रिक समिती गठीत करण्यात येईल.

६) लोकसंख्येचा विचार करुन देशाच्या ज्या भागामध्ये श्री साईबाबांची मंदिरे नाहीत, अशा ठिकाणी मंदिर उभारणीसाठी प्राधान्य देणे. ज्या भक्तांना शिर्डी येथे दर्शनासाठी येण्यास अडचणी येतात, त्यांना त्याच ठिकाणी दर्शन करणे सोईचे होईल.

७) साई मंदिर उभारणीसाठी जागेची उपलब्धता पाहून साईभक्तांस अनुदान देणे व सदर अनुदानाची मर्यादा निश्चित करणे. सदर अनुदानाची मर्यादा ही श्री साईबाबा संस्थानकडून ५०% किंवा जास्तीत जास्त रु.५० लाख व साईभक्तांच्या सहभागातून ५०% अशी राहील. यापैकी जे कमी असेल ते अनुदान देणे.

८) मंदिर उभारणीसाठी जागा निश्चित झाल्यानंतर अंतिमतः निवड झालेल्या ट्रस्ट यांचेशी करार करुन नोंदणी करण्यात येईल. त्यांना मंदिर उभारणीसाठी अनुदानाची रक्कम अदा केली जाईल. मंदिर बांधून पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला देणे बंधनकारक राहील.

९) श्री साईबाबा संस्थान, शिर्डी च्या धर्तीवर साईभक्तांकडून प्राप्त झालेली देणगी रक्कम, सोने-चांदी, मौल्यवान जड-जवाहीर, परकीय चलन, इतर वस्तू व जमा-खर्च इ. चे वेळोवेळी प्रचलीत कायद्यानुसार वार्षिक लेखापरिक्षण करुन अहवाल संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

(पी. शिवा शंकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी